**रे.मु.नं.३८७/२०१७**

**संगीता भोसले वि. एकनाथ चव्हाण**

**नि.६३ लगत**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. १</u>**

**साक्षीदाराचे नावः- संगीता प्रकाश भोसले,**

**<u>शपथेवर वादी साक्षीदार नं. १ चा पुढील सरतपास वकील श्री.ए.व्ही.काकडे यांचे मार्फत.</u>**

०१. माझ्या सरतपासातील मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे खरा व बरोबर असुन त्यावर मी सही केली आहे.

०२. मी प्रस्तुत प्रकरणामध्ये मौजे भावीनिमगांव येथील जमीनीचे एकुण बारा ७/१२ उतारे दाखल केलेली आहेत. त्यास अनुक्रमे **नि.क्र.६६ ते ७७** देण्यात येते. तसेच मौजे दहिगावने येथील जमीनीचे एकुण दोन ७/१२ उतारे दाखल केलेली आहेत. त्यास अनुक्रमे **नि.क्र.७८ व ७९** देण्यात येते.

०३. वादीने प्रस्तुत प्रकरणात नि.क्र.४/१५ वर दाखल केलेला दि.०९.०३.२०१५ रोजीचे वाटणीपत्र प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री.के.के.गलांडे यांनी कबूल केल्याने त्यास **निशाणी क्रमांक ८०** देण्यात येते.

०४. मी माहितीच्या अधिकाराखाली मा.तहसिलदार शेवगाव यांचेकडे दावा मिळकतीसंदर्भात झालेल्या वाटणीसंदर्भातील सर्व कागदपत्रांची मागणी केली होती. मला सदर कार्यालयामार्फत त्या वाटपासंदर्भातील प्रकरणाची कागदपत्रे पुरवण्यात आली. त्यासोबत मा.तहसिलदार शेवगाव यांचा आदेश देखील आहे. सदर वाटणीसंदर्भाती संपुर्ण प्रकरण प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री.के.के.गलांडे यांनी कबूल केल्याने त्यास **नि.क्र.८१** देण्यात येते.

०५. मी प्रस्तुत प्रकरणामध्ये ८-अ चे एकुण सात उतारे दाखल केलेली आहेत. त्यास अनुक्रमे **नि.क्र.८२ ते ८८** देण्यात येते.

०६. मी प्रस्तुत प्रकरणामध्ये फेरफार क्र.४२७७ व ४२७९ फेरफार दाखल केलेली आहेत. त्यास **नि.क्र.८९ व ९०** देण्यात येते. तसेच फेरफार क्र.४२०२, ४२०४, १४५२, ७०७७,

१६६१ दाखल केलेली आहेत. त्यास अनुक्रमे **नि.क्र.९१ ते ९५** देण्यात येते. तसेच प्रस्तुत प्रकरणामध्ये मौजे दहिगावने येथील गट क्र.२९२/१ चा ७/२ उतारा दाखल केलेला आहे. त्यास **नि.क्र.९६** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**

**(साक्षीदाराचा उलटतपास प्रतिवादीतर्फे श्री.के.के.गलांडे यांचे विनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत तहकुब)**

दि. २४.०७.२०२५

श्रवणोत्तर स्वीकृती

sd/-

(डी.आर.कुलकर्णी)

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क स्तर

शेवगाव.